पान नं.१
नि.फौ.ख.-२३०/२०२२
नि.क्र.४८

<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा</u>
मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - दिपक काशीनाथ नलगे
वय - ५२ वर्षे,
व्यवसाय - शेती
राहणार - चिंचोली, ता. राहुरी जि.अ.नगर

<u>सरतपासणी - सहा.सरकारी अभियोक्ता श्री.आर.के.गागरे</u>

१. दि. १२/०२/२०२२ रोजी पोलीसांनी मला चिंचोली गावातील प्रवरा नदीच्या पात्राजवळ बोलावले होते. त्या दिवशी नदीवर असलेल्या मोटारीचे पाईप तसेच केबल हे कापलेले होते. त्या ठिकाणावरील इलेक्ट्रीक मोटारी या चोरीला गेलेल्या होत्या. पोलीसांनी माझ्या समक्ष जागेचा दिशादर्शक पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावरील अनुक्रमांक २ वरील सही माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळास पंचनाम्यास <u>निशाणी क्र.पी२</u> देण्यात येते.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए. के. डोखे यांच्यामार्फत-</u>

२. मी पदवीधर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्जेराव पठारे हे माझे मित्र आहेत. सर्जेराव पठारे हे माझ्याच चिंचोली गावातील रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चिंचोली गावातील प्रवरा नदीचे पात्र हे मोठे आहे. सर्जेराव पठारे यांची विहीर कोठे होती हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला केवळ सही करण्यास सांगीतली. पंचनाम्यासाठी पोलीसांनी मला पठारेंची विहीर दाखविली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही प्रवरा नदीपात्रात गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे सर्जेराव पठारे यांच्याकडे नेहमी येणेजाणे असते.हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबद्दल काहीही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी पठारे हे माझे मित्र असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून मी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.08.12 20:28:13 +0530

(श्री. पी. एच. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.२,राहुरी

राहुरी
दिनांक - ११/०८/२०२५.